**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २९ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस; राज्यभरात संभाव्य राजकीय समीकरणांची जुळवाजुळव.**
2. **अरावली टेकड्यांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय.**
3. **नववर्षाच्या स्वागतासाठी नागपूर नजीकच्या राज्य पर्यटन महामंडळाच्या निवास स्थानांना पर्यटकांची पसंती.**
4. **विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात सातत्याने निच्चांकी तापमानाची नोंद, आज ८ पूर्णांक ८ अंश सेल्सियस इतकं किमान तापमान.**

---

राजकीय समीकरण

राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन आणि राजकीय पक्षांची, उमेदवारांची तयारी जोरात सुरु आहे. निवडणुकीसाठी उमेदवार अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. महायुती आणि महाविकास आघाडी स्थानिक घटकांवर जोर देत वेगवेगळ्या तडजोडी करत आहेत तसंच पक्षांतर होत आहे. मुंबईत काँग्रेस आणि बहुजन वंचित आघाडीमधे समेट झाला आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढवायची ठरवलं आहे. रिपब्लिकन पक्षाला किमान १६ जागा महायुतीने द्याव्या अशी मागणी रामदास आठवले यांनी केली आहे. पिंपरी चिंचवडप्रमाणे पुण्यात शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचे पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहेत अशी घोषणा आज अजित पवार यांनी केली. पुण्यात काँग्रेस 60 जागा आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट 45 जागा लढवण्याबाबत निर्णय झाला असून वंचित आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांना जागा देण्याबाबत चर्च सुरू आहे. अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची उमेदवारांची दुसरी यादी जिल्हाप्रमुख पराग गुडधे

यांनी जाहीर केली. या यादीनुसार आतापर्यंत एकूण २० उमेदवारांची घोषणा करण्यात आली असून महिला, अल्पसंख्याक, आणि मागासवर्गीय नव्या चेहऱ्यांना प्राधान्य देत सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अकोला महानगरपालिकेसाठी महायुती आणि महाविकास आघाडीचे जागावाटप अद्याप अंतिम न झाल्याने कोणत्याही पक्षाचा उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही, तसेच अधिकृत उमेदवार यादीही जाहीर झालेली नाही. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीने स्वतंत्र लढतीची घोषणा करत पाच उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत.

---------------------------------------

सर्वपक्षीय मोर्चा

भंडारा नगर परिषद निवडणुकीत वॉर्ड क्रमांक ३ मधील राष्ट्रवादी पक्ष - शरद पवार गटातील उमेदवाराच नाव मतमोजणी दरम्यान ईव्हीएममधून गायब झाल्यानं निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ आज भंडाऱ्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला असून ईव्हीएमची प्रतीकात्मक शवयात्रा काढण्यात आली. या मोर्चात राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार चरण वाघमारे, शिवसेना शिंदे गटाचे आमदार नरेंद्र भोंडेकर, काँग्रेससह विविध पक्षांचे पदाधिकारी आणि पराभूत उमेदवार सहभागी झाले. दोषी दोन अधिकाऱ्यांना १० दिवसांत निलंबित न केल्यास १२ जानेवारीला भंडारा बंदचा इशारा देण्यात आला आहे.

---------------------------------------

निवडणूक लांबणीवर

अमरावती जिल्हा परिषदेत आरक्षण 64 टक्क्यांवर गेल्यामुळे येथील जिल्हा परिषद निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयानं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी 50 टक्के आरक्षणाची अट घातल्याने अमरावतीचा पहिल्या टप्प्यात समावेश होणार नाही, अशी माहिती हिंदुस्थान समाचार वृत्त संस्थेनं दिली. राज्यातील केवळ 12 जिल्हा परिषदांमध्येच आरक्षण मर्यादेत असल्याने त्याच ठिकाणी निवडणुका होणार असून, अमरावतीसह अन्य जिल्ह्यांचा निर्णय न्यायालयाच्या पुढील सुनावणीनंतर स्पष्ट होणार आहे.

---------------------------------------

अरावली

अरावली डोंगररांगांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा निर्णय आज सर्वोच्च न्यायालयाने दिला. अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयानं दखल घेतली. आज या प्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती एजी मसीह आणि जे के महेश्वरी यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. अरवली टेकड्यांच्या नव्या व्याख्येबाबत काही गोष्टी स्पष्ट करणं आवश्यक आहे, आधीच्या समितीच्या शिफारशींची पडताळणी करण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल, ज्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचाही समावेश असेल असं न्यायालयानं सांगितलं. नुकत्याच स्वीकारण्यात आलेल्या नव्या व्याख्येनुसार, अरावली टेकड्यांमध्ये समुद्रसपाटीपासून कमीतकमी १०० मीटर आणि त्यापेक्षा जास्त उंची असलेला आणि त्याला जोडणारा उतार असलेला भूप्रदेश समाविष्ट करण्यात आला आहे. अरावली टेकड्यांबाबतचे निकष सौम्य केल्यामुळे या भागातलं खाणकाम आणि बांधकाम प्रकल्पांना वैधता मिळेल, आणि त्यामुळे पर्यावरणाची अपरिमित हानी होईल, असा इशारा पर्यावरण तज्ञांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर अलीकडेच राजस्थानसह अनेक भागांत जन आंदोलन करण्यात आलं होत.

---------------------------------------

महाराष्ट्र राज्य पर्यटन

नववर्षाच्या स्वागतासाठी नागपूर आणि परिसरातील महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाचे सर्व रिसॉर्ट 100 टक्के भरले आहेत, तर खासगी हॉटेल्समध्येही सुमारे 80 टक्के बुकिंग झाले आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्प, पेंच-सिल्लारी, नवेगाव-नागझिरा, नवेगावबांध, बोदलकसा, इथल्या पर्यटक निवासांना मोठी पसंती मिळत आहे. नाताळ आणि 31 डिसेंबरच्या सुट्ट्यांमुळे कौटुंबिक पर्यटकांचा ओघ वाढला असून वन्यप्रेमी आणि निसर्ग पर्यटन केंद्रे हाऊसफुल्ल झाली आहेत. एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये रोषणाई, स्थानिक खाद्यपदार्थ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आल असून, बुकिंगसाठी सतत चौकशी होत असल्याची माहिती एमटीडीसी प्रशासनान दिली.

---------------------------------------

सुरक्षा विषयक

विकसित भारत ध्येयाच्या अनुशंगानं २०२५ हे वर्ष भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने निर्णायक ठरलं. ऐकुया याबाबत विशेष वृत्तांत -

*(व्हॉइस कास्ट - नम्रता)*

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतानं दहशतवादाविरोधात स्पष्ट, कठोर आणि निर्णायक धोरण स्वीकारले. "दहशतवादावर पंचसूत्री अंगीकारत', हल्ल्यांना तात्काळ प्रत्युत्तर, अणुधमक्यांना योग्य प्रतिरोध, दहशतवादी आणि त्यांच्या समर्थकांमध्ये भेद न ठेवणे, चर्चेत दहशतवादाचा बिमोड करण्यालाच प्राधान्य आणि सार्वभौमत्वावर शून्य तडजोड या बाबींचा अवलंब करण्यात आला. ७ मे २०२५ रोजी झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ने भारताची नवी सुरक्षा भूमिका जगासमोर मांडली; भारतीय नागरिकांवर हल्ला झाल्यास शत्रूच्या भूमीत घुसूनही कारवाई केली जाईल, हा स्पष्ट संदेश देण्यात आला. पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर अचूक हल्ले करत भारताने प्रभावी प्रतिबंधक क्षमता दाखवली. या मोहिमेत 'मेड इन इंडिया' तंत्रज्ञान, ब्रह्मोस क्षेपणास्त्रे, राफेल विमाने आणि ड्रोनचा प्रभावी वापर झाला. संरक्षण उत्पादन, अर्थसंकल्प, आधुनिक शस्त्रसज्जता आणि स्वदेशीकरणामुळे भारताची लष्करी ताकद अधिक भक्कम झाली. एकूणच २०२५ मध्ये भारताने राष्ट्रीय सुरक्षा ही तडजोड न करता जपली जाईल, हे ठामपणे सिद्ध केले. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून नम्रता फलके)***

---------------------------------------

भीमा कोरेगाव शौर्य दिन

नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी यांच्या वतीने येत्या १ जानेवारी रोजी भीमा कोरेगाव शौर्य दिन अभिवादन सोहळ्याच आयोजन दीक्षाभूमी परिसरात करण्यात आल आहे. सायंकाळी ५ वाजता दीडशे सेवानिवृत्त महार रेजिमेंट सैनिक भीमा कोरेगाव स्तंभाला मानवंदना देतील. तर वंचित बहुजन युवा आघाडी महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने ३१ डिसेंबर रोजी पुणे ते भीमा कोरेगाव शौर्य स्तंभ अभिवादन बाईक रॅलीत सहभागी होण्यासाठी अकोला जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोटरसायकलने रवाना झाले आहेत . सुमारे ५५० किमीचा प्रवास करत बुलढाणा, औरंगाबाद, अहिल्यानगर, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील युवा कार्यकर्ते या रॅलीत सहभागी होणार आहेत.

---------------------------------------

व्ही बी जी-राम-जी

विकसित भारत - रोजगार आणि उपजीविका हमी अभियान ग्रामीण: व्ही बी जी-राम-जी कायद्यामुळे, गेल्या सात वर्षांच्या सरासरी वाटपाच्या तुलनेत अनेक राज्यांना १७ हजार कोटी रुपयांचा निव्वळ नफा होण्याची शक्यता स्टेट बँक ऑफ इंडियानं वर्तवली आहे. एसबीआयचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. सौम्य कांती घोष यांनी लिहिलेल्या या अहवालात या कायद्यानुसार स्पर्धात्मक प्रकल्पांची ओळख, उत्पादक मालमत्ता निर्मिती, वाढीव उत्पन्न निर्मिती आणि कार्यक्षम देखरेख यंत्रणा यांच्याशी संबंधित आव्हानांवर लक्ष केंद्रित केले जाईल असं नमूद केलं.

---------------------------------------

मतदान जनजागृती

महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृती आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या वतीने 'हॅपी स्ट्रीट' उपक्रमाच आयोजन करण्यात आलं. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत मतदानाची शपथ आणि "मी नक्की मतदान करणार" या स्वाक्षरी अभियानात सहभाग नोंदवला. चालणे, योग, व्यायामासह लोकशाहीतील मतदानाचे महत्त्व पटवून देत शंभर टक्के मतदानाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

---------------------------------------

बाल वैज्ञानिक प्रदर्शनी

५३ व्या बाल वैज्ञानिक प्रदर्शनीचं आयोजन भंडारा जिल्ह्यातील विनोद विद्यालय, सिल्ली इथं ३१ डिसेंबर ते २ जानेवारी या कालावधीत करण्यात आलं आहे. यात "विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी STEM" या मुख्य विषयावर आधारित सहा उपविषयांवरील मॉडेल्सचे जिल्हास्तरीय प्रदर्शन होणार आहे. ३१ डिसेंबर रोजी या प्रदर्शनाचं उद्घाटन आमदार नाना पटोले यांच्या हस्ते होईल तर अध्यक्षस्थान खासदार डॉ. प्रशांत पडोळे भूषवतील. जिल्ह्यातील तालुकास्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मॉडेल्स सादर होणार असून उत्कृष्ट स्पर्धक विभागीय स्तरासाठी पात्र ठरणार आहेत.

---------------------------------------

हवामान

विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात सातत्याने निच्चांकी तापमानाची नोंद होते आहे. आज देखील गोंदिया इथं ८ पूर्णांक ८ अंश सेल्सिअस इतकं सर्वात कमी किमान तापमान नोंदवण्यात आलं. गोंदिया पाठोपाठ नागपूर आणि यवतमाळ इथं ९ पूर्णांक ६ अंश तर भंडारा इथं १० अंश सेल्सिअस आणि गडचिरोली इथं १० पूर्णांक २ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. विदर्भात थंडीचा कडाका कायम असून आगामी काही दिवस हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

----------------------------------------